
"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

KOLHAPUR



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित

# विवेकानंद कॉलेज, (स्वायत्त) कोल्हापूर,

## समाजशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष 2021 - 22

---

दि. 05/12/2021

## नोटीस

समाजशास्त्र विभागातील बी. ए. भाग 3 च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष 2021 - 22 च्या पहिल्या सत्राच्या अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे सेमिनार दिनांक 05/01/2022 पर्यंत समाजशास्त्र विभागात जमा करावेत.

एच. व्ही. चामे

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Student Marks Entry

Course: B A SEM 5

Session: JAN-FEB 2022

Subject: SOCIOLOGY-X (DSE - 1021E4) - CIE

| Sr.No. | PRN No | Seat No | Student Name | Marks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2019014806 | 482050 | *SALAGAR SNEHA MARUTI SUNITA | 9 |
| 2 | 2019014516 | 482212 | *BAMANE GAURI ANANDA ARCHANA | 10 |
| 3 | 2019014531 | 482213 | *BHORE DIPTI HARIDAS DURGA | 10 |
| 4 | 2019014537 | 482214 | *BHOSALE RUTUJA TANAJI RAKHI | 9 |
| 5 | 2019014568 | 482215 | DHAKAVE VISHAL BAPUSO DIPMALA | 10 |
| 6 | 2019014597 | 482218 | *GURAV PRAJAKTA MADHUKAR SAVITA | 10 |
| 7 | 2019014620 | 482219 | JATHAR DHANANJAY SURESH KAVITA | 10 |
| 8 | 2019014645 | 482220 | *KAMBLE SHITAL RAJARAM ARCHANA | 9 |
| 9 | 2019014650 | 482221 | KAMBLE VIJAY MAHENDRA | 9 |
| 10 | 2019014661 | 482222 | *KAVTHEKAR SHILPA BABURAO SUVARNA | 10 |
| 11 | 2019014682 | 482224 | *KOLI RUPALI HAMBIRRAO MANGAL | 10 |
| 12 | 2019014714 | 482225 | MANE KETAN ANAND SAROJA | 10 |
| 13 | 2019014733 | 482227 | MUJAWAR AADIL ASLAM | 10 |
| 14 | 2019014734 | 482228 | MUJAWAR MUSKAN SHABBIR | 9 |
| 15 | 2019014737 | 482229 | *NAGSEN ROHINI JAYPAL SAVITA | 10 |
| 16 | 2019014745 | 482230 | NIGADE HEMANT BABAN LAXMI | 10 |
| 17 | 2018014763 | 482231 | PATIL MANDAR MOHAN MANASI | 9 |
| 18 | 2019014772 | 482232 | *PATIL PRIYANKA ASHOK ANITA | 10 |
| 19 | | 482233 | *PATIL PRIYANKA UTTAM SANGEETA | 10 |
| 20 | 2019014777 | 482234 | *PATIL SANJEEVANI JOTIRAM KANCHAN | 10 |
| 21 | 2018014792 | 482235 | *PATOLE POURNIMA AMAR JYOTI | 10 |
| 22 | 2019014787 | 482236 | *PAWAR SHITAL HARIDAS VIDYA | 10 |
| 23 | 2019014844 | 482237 | *SULGEKAR MANISHA PARASHRAM SANGITA | 10 |
| 24 | 2019014847 | 482238 | *SUTAR AARATI RANGRAV MANGAL | 10 |
| 25 | 2019014850 | 482239 | *SUTAR PALLAVI BHAGVAN SUNITA | 10 |
| 26 | 2019014848 | 482240 | *SUTAR POOJA RANGRAV MANGAL | 10 |
| 27 | 2019014851 | 482241 | *SUTAR PRIYANKA NARAYAN GEETA | 10 |
| 28 | 2019014854 | 482242 | SUTAR SUMIT ASHOK SUWASINI | 10 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

09/10

Name : Muskan Shabbir Mujawar
Roll No : 5628
Subject : Sociology
Paper No : 10

Que. 1 नगरवाद स्पष्ट करा.

→ प्रस्तावना,—

नगरवाद ही नगर समाजशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे. नागरी पर्यावरणामध्ये राहणाऱ्या लोकांची विशीष्ट अशी एक जीवनपद्धती असते. ते लोकांचे राहणीमान, बोलणे, चालणे, खाणेपिणे, शिष्टाचार, वेशभूषा, केशभूषा या बाबी वैशिष्ट्यपूर्ण असतात आणि त्याबाबत हे लोक विशेष जागरूक असतात. नगरातील लोकांची ही जो वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती किंवा जीवन जगण्याचा एक विशिष्ट मार्ग वा शैली (Way to life or life style) असते तिला उद्देशूनच नगरवाद ही संज्ञा वापरली जाते.

व्याख्या,—

① लुईस वर्थ : नगरवाद ही संकल्पना लुईस वर्थ या समाजशास्त्राने विकसीत केलेली आहे. आपल्या एका लेखात त्याने "नगरवाद हा जीवनाचा एक मार्ग आहे" अशा शब्दात नगरवादाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे.

② विल्यम स्कॉटच्या मते "सापेक्षतः लहान आकाराच्या क्षेत्रात मोठ्या लोकसंख्येचे केंद्रिकरण झाल्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या सामाजिक आंतरक्रियेच्या व संस्कृतीच्या प्रतिमानांस नगरवाद म्हणतात."

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

नगरवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे,—

(1) लुईस वर्थ यांनी नगरवादाची पुढील तीन वैशिष्ट्ये सांगितली

(अ) अस्थिरता किंवा अल्पकालिनता,—
नगरवाद ही एक विशिष्ट अशी जीवन पद्धती असून या जीवनपद्धतीत लोकांचे परस्परांशी येणारा संबंध हे अल्पकाळ टिकणारे म्हणजेच क्षणिक स्वरूपाचे असतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात स्थिरता नसते. नागरी जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामात अत्यंत व्यस्त असतो. तसे स्पर्धा ही मोठ्या प्रमाणावर असते.

(ब) दिखाऊपणा किंवा कृत्रिमता,—
नागरी जीवनपद्धतीत दिखाऊपणा, नाटकीपणा, कृत्रिमता मोठ्या प्रमाणात असते. नागरी लोकांचे जीवन अत्यंत व्यस्त, धुंतागुंतीचे व औपचारिक स्वरूपाचे असते त्यामुळे इतरांशी घनिष्ठ, मनमोकळेपणाचे, आपुलकीचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी करणारा वेळ त्याच्याकडे नसतो तसेच त्याबाबतची इच्छाशक्तीही नसते. त्यामुळे नागरी जीवनात केवळ शिष्टाचार पाळला जातो.

(क) अपरिचितता,—
नगरात लोकांची प्रचंड गर्दी असते. जोतो आपल्याच घाईत व नादात वावरत असतो. प्रत्येकजण एक प्रकारच्या अनोळखी किंवा अपरिचित वातावरणात राहत असतो. गर्दीत राहूनही व्यक्ती एकाकी असते. ती बहुसंख्य लोकांना ओळखत नसते तसेच बहुसंख्य लोकही तिला ओळखत नसतात. व्यक्ती ज्यांना ओळखते किंवा जे लोक व्यक्तिला ओळखतात अशा लोकांचा समुळ अत्यंत लहान असतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

FaceLook DATE / /

② नेल्स एण्डरसन आणि के. ईश्वरन यांनी नगरवादाची पुढील वैशिष्ट्ये सांगितली आहेत,—

Ⓐ मुद्राप्रधान अर्थव्यवस्था,—
नगरातील लोकांचा फारसा परस्परांशी संबंध नसतो. तसेच त्यांच्या सर्वच गरजांची पुर्तता ही पैशाद्वारे होत असते. त्यामुळे लोक पैसाला खुपच महत्व देत असतात नागर समुदायातील कोणत्याही वस्तु व सेवांची खरेदी-विक्री ही पैश्याचा माध्यमातून होते. त्यामुळे सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदु हा पैसा असतो.

Ⓑ लिखित प्रमाण,—
नागरी जीवनपद्धतीत लोक परस्परांशी सहसा तोंडी व्यवहार करीत नाहीत. त्यांच्यामध्ये जो काही व्यवहार किंवा करार होतो तो प्रामुख्याने लिखित स्वरूपाचा असतो अनेक महत्वाचे व्यवहार तर कोर्ट स्टॅपवर साक्षीदाराच्या सहीनेच होतात. मोठ्या प्रमाणावरील पैशाची देवघेव ही रोखीने न होता चेक वा ड्राफ्ट ने होते. आणि असे व्यवहार योग्य व अवश्यक मानले जातात. म्हणून नागरी जीवनात प्रत्येक व्यवहाराची कागदोपत्री नोंद ठेवण्यावर विशेष भर दिला जातो.

Ⓒ शोध आणि तंत्र यांची विविधता,—
नागरी जीवनात तंत्रविद्या ही खुपच विकसित असते आणि विविध क्षेत्रांत नित्य नवे शोध लागत असतात. ही तंत्रविद्या व शोध मानवाच्या गरजा पूर्ण करतात त्याच्या सुखसोयीत वाढ करतात, शिवाय मानवी संबंध अधिकाधिक संकीर्णही बनवितात. मानवी जीवनात नवनव्या समस्याही निर्माण करतात. आणि या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी नवीन व्यवस्था निर्माण केल्या जातात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

DATE / /

⑤ संघटीत आणि दृढ प्रशासन,—
नागरी जीवनात तंत्रविद्या ही खुपच विकसित असते. नागरी जीवनात विशालता, संकीर्णता व अपरिचितना या गोष्टीशी सामना करण्यासाठी संघटीत व दृढ प्रशासनाची आवश्यकता असते. नागरी जीवनात गृहबांधणी वाहतूक, दळणवळण, साफसफाई, वीज, पाणी, गलिच्छ वस्ती सुधारणा, समाजकल्याण कुटुंब नियोजन, व्यापार इत्यादी क्षेत्रात विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात.

⑥ सांस्कृतिक शोध,—
नागरी जीवनात भौतिक जीवनात परिवर्तन वेगाने होत रहाते. आणि त्याचा परिणाम म्हणून सांस्कृतिक जीवनात ही परिवर्तन घडून येण्यास चालना मिळते. नवनवीन सांस्कृतिक तत्वे उदयास येऊन नागरी संस्कृती विकसित होत असते. असे असले तरी भौतिक विकासामुळे नागरी जीवनात नवीनवी सांस्कृतिक तत्वे समाविष्ठ होत असतात.

09/10

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)